पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ८० /२०२४ दि. २३ /०४/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी, कापूरबावडी** वाहतूक उपविभागचे हद्दीत दि. ३०/०४/२०२४ ते दि. ०२/०५/२०२४ रोजीपावेतो **'साईबाबा मंदिराचा २४ वा वर्धापन दिन'** साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम व भंडाऱ्याचे आयोजन करण्यात येते. तसेच उत्सवाचे दरम्यान भाविकांची मोठया प्रमाणात गर्दी होत असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) साकेत कडून बाळकुम मार्गे कशेळी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **लोढा सोसायटी कडे जाणारे कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने डावे वळण घेवून लोढा सोसायटी संकुलातून माजिवडा मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) कशेळी कडून बाळकुम मार्गे साकेत कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **बाळकुम नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने कापूरबावडी सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना दि. ३०/०४/२०२४ ते दि. ०२/०५/२०२४ रोजीपावेतो १७:०० ते रात्रौ २४:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट, ठाणे.

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक

<u>**प्रत**</u> :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**</u>
स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग,/पोनि कापूरबावडी, वागळे, राबोडी वाहतूक उप विभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.